बुधवार, दि ११ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २६ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

### इराण-अमेरिका-इस्त्रायल संघर्षाचा जालना स्टील उद्योगावर परिणाम

## स्टील ३ हजार रुपयांनी महाग

### गल्फ देशांतून येणाऱ्या स्क्रॅपची आयात ठप्प; कोळशाच्या दरवाढीचाही परिणाम

**जालना । प्रतिनिधी -** इराण आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या तणाव व युद्धपरिस्थितीचा परिणाम आता जालना येथील स्टील उद्योगावरही दिसून येत आहे. गल्फ देशांमधून भारतात आयात होणाऱ्या स्क्रॅपचा पुरवठा सध्या मंदावल्याने जालन्यातील स्टीलच्या दरात सुमारे तीन हजार रुपयांनी वाढ झाल्याची माहिती उद्योग क्षेत्रातून समोर आली आहे.
जालना हे राज्यातील महत्त्वाचे स्टील उत्पादन केंद्र मानले जाते. येथे मोठ्या प्रमाणात स्क्रॅपवर आधारित स्टील निर्मिती केली जाते. मात्र सध्या गल्फ देशांमधून येणारे कच्चे साहित्य (स्क्रॅप) युद्धपरिस्थितीमुळे थांबले किंवा कमी झाले आहे. परिणामी स्टील उत्पादक उद्योगांना कच्च्या मालाची टंचाई जाणवू लागली आहे.
याचबरोबर कोळशाच्या दरातही वाढ झाल्याने उत्पादन खर्च वाढला आहे. कच्चा माल आणि इंधन दोन्ही महाग झाल्याने जालन्यातील स्टीलच्या दरात जवळपास तीन हजार रुपयांनी वाढ झाली आहे. उद्योग क्षेत्रानुसार, जागतिक स्तरावर सुरू असलेल्या या संघर्षाचा थेट परिणाम स्थानिक उद्योगांवर होत असून त्याची झळ आता सर्वसामान्यांनाही बसू लागली आहे.
कालिका स्टीलचे अध्यक्ष घनश्यामशेठ गोयल यांनी सांगितले की, गल्फ देशांतून येणाऱ्या स्क्रॅपच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्यामुळे स्टील उद्योग अडचणीत आला आहे. तसेच कोळशाच्या भाववाढीमुळे उत्पादन खर्च वाढला असून त्यामुळे स्टीलचे दर वाढणे अपरिहार्य झाले आहे. सध्या सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय तणावामुळे पुढील काळात स्टीलच्या दरात आणखी चढ-उतार होण्याची शक्यता उद्योग क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.



## महसूल भवनात १६ मार्चपासून तीन दिवसीय प्रशिक्षण

**जालना । प्रतिनिधी -** भारताची आगामीजनगणना २०२७ यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. या जनगणनेचा पहिला टप्पा म्हणजेच घरसूचीकरण व गृहनिर्माण जनगणना लवकरच सुरू होणार असून, या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय विशेष जिल्हास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. आगामी जनगणनेच्या दृष्टीने हे प्रशिक्षण अत्यंत कळीचे असल्यामुळे, कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याला प्रशिक्षणास अनुपस्थित राहता येणार नाही. संपूर्ण प्रशिक्षण घेणे सर्वांसाठी बंधनकारक असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी शशिकांत हदगल यांनी पत्राद्वारे कळविले आहे. हे प्रशिक्षण दि. १६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत महसूल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे पार पडणार आहे. प्रशिक्षणाची वेळ सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० अशी पूर्ववेळ निश्चित करण्यात आली आहे. जनगणना संचालनालय, मुंबई येथील वरिष्ठ अधिकारी या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये सहायक संचालक अजय ठाकूर, विशाल दिवेकर हे अधिकारी उपस्थित कर्मचाऱ्यांना जनगणना प्रक्रियेतील तांत्रिक बाबी, नियमावली आणि विहित वेळेत काम पूर्ण करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. या प्रशिक्षणासाठी संबंधित विभागाचे प्रमुख आणि त्यांच्या अधीनस्थ जनगणना कामकाज पाहणारे सहायक महसूल अधिकारी, महसूल सहायक किंवा प्रतिनियुक्त कर्मचारी यापैकी प्रत्येक कार्यालयातून दोन कर्मचाऱ्यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे.

## लक्ष्मी कॉटन स्पिन कंपनीत जागतिक महिला दिन साजरा

### महिलांना कायदे व योजनांची दिली माहिती

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सामनगाव येथील लक्ष्मी कॉटन स्पिन कंपनीत महिलांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिला व बालविकास विभाग जालना अंतर्गत अभय केंद्र (जालना व अंबड) आणि सखी वन स्टॉप सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महिलांना कायद्याची, सुरक्षा यंत्रणांची आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.
कार्यक्रम जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. व्ही. कड आणि संरक्षण अधिकारी एस. जी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी संरक्षण अधिकारी मीनाक्षी शिंदे, संरक्षण अधिकारी नामदेव काकडे, सखी वन स्टॉप सेंटरच्या वनिता पिंपळे, महिला सक्षमीकरण जेंडर स्पेशालिस्ट पुष्पा कापसे, आणि चाईल्ड हेल्पलाईन प्रतिनिधी मंगल उगले यांनी उपस्थित महिलांना विविध विषयावर मार्गदर्शन केले. कंपनीचे संचालक संजयजी राठी आणि एच.आर. सचिन जगधने यांची देखील प्रमुख उपस्थिती होती.

### जालना ग्रंथोत्सवाचे उत्साहात उदघाटन संपन्न

## वाचन हे व्यक्तिमत्व विकासाचे साधन आहे - प्रा. चंद्रकांत पोतदार

**जालना । प्रतिनिधी -** मानवी जीवनात ग्रंथांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. केवळ ग्रंथसंग्रह असून चालत नाही, तर श्रवण, आकलन आणि वाचन या त्रिसूत्रीची जोपासना होणे आवश्यक आहे. आजच्या धावपळीच्या युगात वाचनाची समृद्धी ही प्रत्येक व्यक्तीची गरज बनली आहे. समृद्ध समाज घडवण्यासाठी ग्रंथोत्सवासारखी व्यासपीठे आवश्यक असून वाचन ही केवळ आवड नसून ते व्यक्तिमत्व विकासाचे साधन आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकांत पोतदार यांनी केले.
जालना शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह टाऊन हॉल येथील आयोजित दोन दिवसीय ग्रंथोत्सव-२०२५ च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राजेश राऊत, मराठवाडा साहित्य परिषदेच्या संचालक डॉ. संजीवनी तडेगावकर, जिल्हा ग्रंथालय असोसिएशनचे अध्यक्ष डी. बी. देशपांडे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकूर आणि डॉ. राजेंद्र सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.
ज्येष्ठ साहित्यिक प्रा. पोतदार म्हणाले की, वाचनामुळे आपल्याला नवनवीन विषय, संस्कृती आणि विचार समजतात. यामुळे आपले संकुचित विचार गळून पडतात आणि विचारांची व्याप्ती वाढते. माणसाने भूतकाळातील घटनांना फारसे चिकटून न राहता आणि भविष्याची अतिचिंता न करता वर्तमानात जगायला शिकले पाहिजे. जो वर्तमानाचा आनंद घेतो आणि वाचनातून स्वतःला समृद्ध करतो, तोच खरा माणूस होय. शब्दांच्या आणि वाचनाच्या निमित्ताने असे ग्रंथ महोत्सव आयोजित करणे ही काळाची गरज आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले.
ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी राज्यातील ग्रंथालयांच्या सद्यस्थितीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, ग्रंथोत्सव हे केवळ पुस्तकांचे प्रदर्शन नसून ती वाचन संस्कृती टिकवून ठेवण्याची एक चळवळ आहे. नवनवीन तंत्रज्ञान येत असले तरी छापील पुस्तकांचे महत्त्व कधीही कमी होणार नाही. ग्रामीण भागातील ग्रंथालयांना अधिक सक्षम करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. ग्रंथोत्सवात वाचक, साहित्यिक आणि लेखकांनी प्रत्यक्ष येवून चांगल्या पुस्तकाचा परिचय व्हावा हा ग्रंथोत्सवाचा उद्देश आहे.
डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी यावेळी आपल्या लेखन प्रवासातील आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या, मी मुळची बीड जिल्ह्यातील असल्याने माझी बोलीभाषा मुळात राकट होती. मात्र, वाचनाची ओढ आणि प्रसारमाध्यमांमधील निवेदिकांचे शब्द ऐकून मी माझी भाषा समृद्ध केली. आज मी जे काही लेखन करू शकले, त्यामागे वाचनाचा मोठा वाटा आहे. माझ्या आयुष्यातील सर्व यशाचे श्रेय मी पुस्तकांना देते. केवळ पैशातून आनंद किंवा समाधान मिळत नाही. जर आपल्याला आपले भविष्य समृद्ध करायचे असेल, तर वाचनाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही, असे सांगत त्यांनी तरुण पिढीला पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन केले.



यावेळी उपस्थित मान्यवरांचे समयोचित भाषणे झाली. दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथोत्सवात विविध विषयांवरील पुस्तकांचे स्टॉल्स लावण्यात आले असून, जालन्यातील पुस्तकप्रेमींनी पहिल्याच दिवशी मोठी गर्दी केली होती. ग्रंथालयीन चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी आणि तरुण पिढीला वाचनाकडे वळवण्यासाठी हा उपक्रम महत्वाचा दुवा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास वाचक, ग्रंथालये प्रमुख, विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
ग्रंथोत्सवाच्या पान ३ वर

## संपादकीय

# भारताने इतिहास डिफिट आणि रिपिट केला

९ मार्च २०२६ ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे कारण या दिवशी टी २० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्युझीलंड संघावर ९६ धावांनी विजय मिळवत टी २० विश्वचषकावर तिसऱ्यांदा भारताचे नाव कोरून इतिहास रचला. या विश्व विजयासोबतच भारताने अनेक विक्रम आपल्या नावे केला. या विजयासोबत भारत तिसऱ्यांदा टी २० चा विश्व विजेता संघ तर बनलाच शिवाय सलग दुसऱ्यांदा आणि घरच्या मैदानावर टी २० विश्वचषक जिंकणारा पहिला संघही ठरला याचाच अर्थ भारताने इतिहास डिफिट आणि रिपिटही केला. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी मी माझ्या इंडिया इतिहास डिफिट करणार आणि रिपिटही करणार या माझ्या लेखात तसे भाकीत वर्तवले होते ते आज खरे ठरले. अर्थात यामागे कोणतेही ज्योतिष किंवा भविष्य नसून भारतीय खेळाडूंचा फॉर्म आणि गुणवत्ता पाहूनच मी तो लेख लिहिला होता. यावेळची टी २० विश्वचषक स्पर्धा भारत आणि श्रीलंका या देशात खेळली गेली. या विश्वचषक स्पर्धेत भारत सुरुवातीपासूनच भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. काहीही करून यावेळी संघाला विश्व विजयी करायचेच अशी खूणगाठ कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी बांधली होती. टी २० विश्वचषक स्पर्धेसाठी कोणते खेळाडू हवेत याचा पक्का विचार करून सूर्यकुमार यादवने त्याला हवे ते खेळाडू संघात घेतले. टी २० स्पर्धेत अष्टपैलू खेळाडूंचे महत्व ओळखून त्याने संघात हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल यांचा संघात समावेश केला. वरुण चक्रवर्ती आणि वॉशिंगस्ट सुंदर यांचा समावेश संघात केला तर जगातील सर्वात घातक वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा, अर्शदीप सिंग मोहम्मद सिराज यांचा संघात समावेश करण्यात आला होता. भारताची गोलंदाजी या स्पर्धे तील सर्वोत्तम गोलंदाजी ठरली. ज्या ज्या वेळी सामना भारताच्या हातातून निसटला असे वाटत होते त्या त्या वेळी गोलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला. अंतिम फेरीतही भारताच्या सर्व गोलंदाजांनी घातक गोलंदाजी केली. जसप्रीत बुमराने संपूर्ण स्पर्धेत जशी घातक गोलंदाजी केली तशीच घातक गोलंदाजी अंतिम सामन्यात करून ४ प्रमुख फलंदाजांना बाद केले आणि न्यूझीलंडच्या फळा फलंदाजीचा कणा मोडत भारताच्या विजयाचा मार्ग सुकर केला. केवळ बुमरानेच नाही तर सर्वच गोलंदाजांनी अप्रतिम गोलंदाजी करून न्यूझीलंडच्या फलंदाजांना जेरीस आणले आणि भारताला ९६ धावांनी एकतर्फी विजय मिळवून दिला. जसप्रीत बुमराने त्याच्या घातक गोलंदाजीने अंतिम सामन्यातील सामानावीर हा किताब मिळवला. संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष लागलेल्या या अंतिम सामन्यात न्यूझीलंडने भारताला प्रथम फलंदाजीसाठी निमंत्रित केले. भारताने मिळालेल्या या संधीचा पुरेपूर फायदा उचलत धमाकेदार सुरुवात केली. भारताचे सलामीवीर संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी भारताला धडाकेबाज सुरुवात करून विश्व विजयाचा पाया रचला. त्यांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले. अभिषेक शर्माने अर्धशतक झळकावले. या स्पर्धेत त्याला त्याच्या लौकिकाप्रमाणे फलंदाजी करता आली नाही मात्र अंतिम सामन्यात त्याने ती कसर भरून काढली. संजू सॅमसनसाठी तर ही स्पर्धा अविस्मरणीय ठरली. सुरवातीच्या काही सामन्यात त्याला संघाबाहेर बसावे लागले पण जेव्हा त्याला संधी मिळाली तेव्हा त्याने या संधीचे सोने केले. वेस्ट इंडिज, इंग्लंड यांच्या विरुद्ध त्याने जशी स्फोटक फलंदाजी केली तशीच अंतिम सामन्यातही करून संघाला पुन्हा एकदा अडीचशेचा टप्पा ओलांडून दिला आणि भारताचा विजय पक्का केला. त्याने संपूर्ण स्पर्धेत तीनशेपेक्षा अधिक धावा काढत मालिकावीर हा किताब मिळवला. भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत फलंदाजी आणि गोलंदाजीत अप्रतिम कामगिरी केली . या स्पर्धेत भारताचे क्षेत्ररक्षणही अप्रतिम होते. एकूणच गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर भारताने अप्रतिम कामगिरी करीत हे विश्व विजेतेपद मिळवले. सूर्यकुमार यादवने संघाचे कर्णधारपद अतिशय कुशलतेने सांभाळले. या विजतेपदात जितका खेळाडूंचा वाटा आहे तितकाच सपोर्ट स्टाफचाही आहे. प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्यांच्या टीमने पडद्यामागे मोठी कामगिरी बजावली त्यामुळेच भारत पुन्हा एकदा आयसीसीच्या स्पर्धेत विजेता बनला. भारतीय संघाचे हे विजेतेपद खास आहे कारण भारतीय संघाचे हे तिसरे टी २० चे विश्व विजेतेपद आहे. २००७ साली भारताने पाकिस्तानला हरवत पहिल्यांदा विजेतेपद मिळवले होते. तेंव्हा भारताचा कर्णधार महेंद्रसिंग धोनी हा होता . त्यानंतर २०२४ साली रोहित शर्मा कर्णधार असताना भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून दुसऱ्यांदा टी २० विश्वचषक जिंकला. त्यानंतर आता म्हणजे २०२६ साली भारतीय संघाने या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. तीनदा टी २० विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला देश आहे. त्यामुळेच भारतासाठी हे विजेतेपद ऐतिहासिक आहे. तीनदा टी २० विश्वचषक जिंकून भारताने आम्हीच टी २० चे चॅम्पियन आहोत हे जगाला दाखवून दिले. हे विजेतेपद मिळवून भारतीय संघाने क्रिकेट विश्वावर आपली मक्तेदारी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. कारण आयसीसीच्या सलग चार स्पर्धेत भारताने अंतिम फेरी गाठली त्यात भारताला तीनदा विजेतेपद मिळवण्यात यश मिळाले. फक्त एकदाच भारताला अंतिम फेरीत पराभव स्वीकारावा लागला तो २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया कडून मात्र त्यानंतर मागील म्हणजे २०२४ च्या टी २० विश्वचषक स्पर्धेत भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून विश्व विजेतेपद मिळवले त्यानंतर मागीलवर्षी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. आता हे विश्व विजेतेपद मिळवून भारताने क्रिकेट विश्वातील आपली मक्तेदारी सिद्ध करून आपणच क्रिकेट मधील सर्वोत्तम संघ आहोत हे जगाला दाखवून दिले आहे. तिसऱ्यांदा टी २० विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद मिळवून इतिहास रचणाऱ्या भारतीय संघाचे हार्दिक हार्दिक अभिनंदन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

# खटला म्हणजे युद्ध नव्हे, एक सुनियोजित प्रकल्प! यशस्वी होण्यासाठी जाणून घ्या लिटिगेशन मॅनेजमेंटचे रहस्य

## ॲड. महेश एस. धनावत, कार्यकारी अध्यक्ष, नोटरी असोसिएशन, यांचे मार्गदर्शन

न्यायालयीन खटला किंवा मुकद्मा म्हटले की, की सामान्य माणसाच्या डोळ्यासमोर उभे राहते ते एक न संपणारे युद्ध, ताणतणाव आणि पैशांचा अपव्यय. अनेक जण या प्रक्रियेला घाबरून न्यायापासून वंचित राहतात. परंतु, खटल्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्यास केवळ यशच नव्हे, तर मानसिक समाधान आणि वेळेची बचतही होऊ शकते. ''खटला हे युद्ध नसून एक सुनियोजित प्रकल्प आहे,'' असे मत नोटरी असोसिएशनचे कार्यकारी अध्यक्ष, ॲड. महेश एस. धनावत यांनी व्यक्त केले. त्यांच्या मते, लिटिगेशन मॅनेजमेंट म्हणजेच खटल्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास यशाची शक्यता कैकपटीने वाढते.

**महाभारताचा धडाः खटला युद्ध का नाही?**

ॲड. धनावत स्पष्ट करतात की, अनेकदा लोक खटल्याला दोन पक्षांमधील युद्ध समजतात. पण ही धारणा चुकीची आहे. युद्धात नियम धाब्यावर बसवले जातात, जसे महाभारतात झाले. सुरुवातीला धर्माचे युद्ध म्हणून सुरू झालेल्या या लढाईत अखेरीस अनेक नियम मोडले गेले. याउलट, न्यायालयीन खटला हा कायद्याच्या, नियमांच्या आणि प्रक्रियेच्या चौकटीतच चालतो. आचार्य चाणक्यांनी जसे प्रत्येक मोहिमेसाठी अचूक नियोजन आणि रणनीती वापरली, त्याचप्रमाणे खटल्यासाठी देखील नियोजन, संसाधनांची जुळवाजुळव आणि ध्येयनिश्चिती आवश्यक असते. म्हणूनच, खटल्याला युद्धाऐवजी एक प्रकल्प मानल्यास तो अधिक प्रभावीपणे हाताळता येतो.

**दिवाणी आणि फौजदारी खटल्यांमधील फरक**

खटल्यांचे प्रामुख्याने दोन प्रकार आहेत:

दिवाणी खटले : हे खटले मालमत्ता, करार, पैशांचे व्यवहार, नोकरी किंवा अधिकारांसंबंधीच्या वादातून निर्माण होतात. यात एका पक्षाने (वादी) दुसऱ्या पक्षावर (प्रतिवादी) आपल्या हक्कांचे उल्लंघन केल्याचा आरोप केलेला असतो.

फौजदारी खटले - जेव्हा एखादी व्यक्ती कायद्याने गुन्हा मानलेले कृत्य करते, तेव्हा फौजदारी खटला सुरू होतो. हे गुन्हे भारतीय दंड संहिता, १८६०, जे आता भारतीय न्याय संहिता, २०२३ म्हणून ओळखले जाते, किंवा इतर विशेष कायद्यांतर्गत येतात. यात शारीरिक इजा, चोरी, फसवणूक यांसारख्या गुन्ह्यांचा समावेश असतो. यात सरकार (पोलीस आणि सरकारी वकील) हे फिर्यादीच्या वतीने आरोपीविरुद्ध खटला चालवते.

**एका केस स्टडीमधून समजून घेऊया लिटिगेशन मॅनेजमेंटचे महत्त्व**

रमेश आणि सुरेश या दोन भावांमध्ये वडिलोपार्जित जमिनीवरून दिवाणी वाद सुरू झाला.

सुरेशचा दृष्टिकोन (व्यवस्थापनाशिवाय): सुरेशने खटला खूप सहजपणे घेतला. तो वकिलांच्या भेटी टाळत असे, आवश्यक कागदपत्रे वेळेवर देत नसे आणि खटल्याच्या खर्चाचे कोणतेही नियोजन केले नव्हते. त्याचा आत्मविश्वास अवास्तव होता. परिणामी, त्याचा खटला कमकुवत झाला, प्रकरण वर्षानुवर्षे चालले आणि अखेरीस निकाल त्याच्या विरोधात लागला.

रमेशचा दृष्टिकोन (व्यवस्थापनासह): रमेशने या खटल्याला एक प्रकल्प म्हणून पाहिले. त्याने वकिलांसोबत बसून आपले ध्येय निश्चित केले. सर्व आवश्यक कागदपत्रे व्यवस्थित फाईल करून ठेवली. खर्चासाठी एक बजेट तयार केले आणि प्रत्येक तारखेला काय झाले याचा पाठपुरावा केला. त्याच्या या सुनियोजितपणामुळे वकिलांना केस प्रभावीपणे मांडता आली, ज्यामुळे कमी वेळेत आणि कमी खर्चात निकाल रमेशच्या बाजूने लागला.

या उदाहरणावरून स्पष्ट होते की, खटल्यात केवळ वकिलांची भूमिका महत्त्वाची नसते, तर पक्षकाराची सजगता आणि व्यवस्थापन कौशल्यही तितकेच महत्त्वाचे असते.

**न्यायालयीन खटल्यांचे जीवनचक्र**

प्रत्येक खटला एका विशिष्ट प्रक्रियेतून जातो. दिवाणी आणि फौजदारी खटल्यांची प्रक्रिया वेगवेगळी असते.

**दिवाणी खटल्याचे टप्पे**

१. दावा दाखल करणे वादी न्यायालयात आपला दावा दाखल करतो.

२. लेखी जबाबः प्रतिवादी वादीच्या दाव्याला आपले लेखी उत्तर सादर करतो.

३. मुद्दे निश्चित करणे न्यायालय दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून वादाचे मुद्दे निश्चित करते.

४. पुरावा दोन्ही पक्ष आपापले म्हणणे सिद्ध करण्यासाठी साक्षीदार आणि कागदपत्रांच्या स्वरूपात पुरावे सादर करतात.

५. उलटतपासणी एका पक्षाचा वकील दुसऱ्या पक्षाच्या साक्षीदारांची उलटतपासणी करतो.

६. अंतिम युक्तिवाद दोन्ही बाजूंचे वकील सर्व पुराव्यांच्या आधारे न्यायालयात अंतिम युक्तिवाद करतात.

७. निकाल न्यायालय दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आपला अंतिम निकाल देते.

**फौजदारी खटल्याचे टप्पे**

१. जामीन अटकेनंतर आरोपी जामिनासाठी अर्ज करू शकतो.

२. दोषारोप निश्चिती पोलिसांच्या तपासानंतर, न्यायालय आरोपीवर गुन्ह्यांचे आरोप निश्चित करते.

३. सरकार पक्षाचा पुरावा आणि उलटतपासणी सरकारी वकील आपले साक्षीदार तपासतात आणि बचाव पक्षाचे वकील त्यांची उलटतपासणी करतात.

४. आरोपीचा जबाब (सरकार पक्षाचे पुरावे संपल्यानंतर, न्यायालय फौजदारी प्रक्रिया संहिता च्या कलम ३१३ नुसार (आता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता चे कलम ३५४), आरोपीला त्याच्यावरील पुराव्यांविषयी स्पष्टीकरण देण्याची संधी देते.

५. बचाव पक्षाचा पुरावा आरोपी स्वतः च्या बचावासाठी साक्षीदार आणि पुरावे सादर करू शकतो.

६. अंतिम युक्तिवाद दोन्ही बाजूंचे वकील अंतिम युक्तिवाद करतात.

७. निकाल न्यायालय आरोपीला दोषी किंवा निर्दोष ठरवते.

ॲड. धनावत शेवटी सांगतात, ''खटला हा एक अनपेक्षित धक्का असू शकतो, परंतु त्याला घाबरून जाण्याची गरज नाही. योग्य कायदेशीर ज्ञान, संसाधनांचे नियोजन, खर्चाचे अंदाजपत्रक आणि ध्येयनिश्चिती यांसारख्या व्यवस्थापन साधनांचा वापर केल्यास कोणताही सामान्य माणूस आपला खटला प्रभावीपणे लढू शकतो. खटल्याच्या संपूर्ण जीवनचक्रात सातत्यपूर्ण आणि समर्पित प्रयत्न करणारा पक्षकारच अंतिमतः विजयाचे फळ चाखतो.''

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# आपले गाव व शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी महिलांनी समर्थपणे पेलावी - सौ. संगीता गोरंट्याल

## जालना तेरापंथ महिला मंडळातर्फे प्रेरणा सन्मान व गृहलक्ष्मी स्वाभिमान अभियान

**जालना । प्रतिनिधी -** आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करत असून, स्वच्छ भारत घडवण्यासाठी आपले गाव आणि शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी महिलांनी समर्थपणे पेलावी, असे आवाहन माजी नगराध्यक्षा तथा नगरसेविका सौ. संगीताताई गोरंट्याल यांनी येथे बोलताना केले.

अखिल भारतीय तेरापंथ महिला मंडळाच्या निर्देशानुसार आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून जालना तेरापंथ महिला मंडळाच्यावतीने प्रेरणा सन्मान व गृहलक्ष्मी स्वाभिमान अभियानाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सौ. गोरंट्याल बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षा ज्योतिबालाजी सेठिया ह्या होत्या.

याप्रसंगी साधना सेठिया यांनी अखिल भारतीय तेरापंथ महिला मंडळाच्या स्थापना आणि कार्याची सविस्तर माहिती दिली. तसेच नारी लोक बुलेटिन आणि मंडळाच्या विविध उपक्रमांवर प्रकाश टाकला. मंडळाच्या संरक्षिका उषाबाई सेठिया यांनी गृहलक्ष्मी स्वाभिमान अभियानाचे महत्त्व विषद करून उपस्थितांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यात आला. मनीषा सेठिया यांनी मानपत्राचे वाचन केले. कल्पना सेठिया यांना प्रेरणा सन्मान, शाल व साहित्य देऊन सन्मानित करण्यात आले तर उर्मिलाजी पिपाडा यांना सेवाभावी संस्थेअंतर्गत केलेल्या कार्याबद्दल प्रमाणपत्र व साहित्य देऊन गौरविण्यात आले.

तसेच रोबोटिक्स व तंत्रज्ञान क्षेत्रात नावलौकिक मिळवणाऱ्या वेदांत सेठियाचाही विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्या संगीताताई गोरंट्याल यांचाही शाल व साहित्य देऊन विशेष सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात दीक्षार्थी श्वेता व कल्पनाजी सेठिया यांच्या जीवनावर आधारित संसार से असार की ओर ही लघुनाटिका सादर करण्यात आली, जिचे लेखन व दिग्दर्शन उषा सेठिया यांनी केले होते. दर्शना सेठिया यांनी दीक्षार्थींचा परिचय करून दिला. कार्यक्रमाची सुरुवात युवतींच्या मंगलाचरणाने झाली. त्यानंतर अध्यक्षा ज्योतिबाला सेठिया यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आणि विविध शाखा मंडळांच्या प्रतिनिधींचे शब्दसुमनांनी स्वागत केले. स्वागतपर भाषणानंतर महिला मंडळाच्या सदस्यांनी प्रेरणा गीत सादर केले. या कार्यक्रमाला शहरातील स्थानकवासी महिला मंडळ, मूर्तीपूजक महिला मंडळ, जीतो संस्था, जैन सोशल ग्रुप, साधना महिला मंडळ, जैन संघटना महिला शाखा आणि राजस्थानी जैन महिला मंडळाच्या सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली संचेती यांनी केले तर आभार सरिता सेठिया यांनी मानले.



पान १ वरुन ...

### वाचन हे ...

पहिल्या दिवसाची सुरुवात अत्यंत उत्साहात झाली. सकाळी गांधी चमन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह अशी भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. यढोल-ताशांच्या गजरात आणि पालखीतील ग्रंथांच्या पूजनाने निघालेल्या या दिंडीने जालन्यातील मुख्य रस्ते दुमदुमले होते. यावेळी महापौर वंदना मगरे व उपमहापौर राजेश राऊत, विनीत सहानी, सुनिल लोणकर, प्रा.पंढरीनाथ सारके यांच्यासह विद्यार्थी आणि ग्रंथप्रेमींच्या सहभागामुळे या दिंडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

उद्घाटन सोहळ्यानंतर किड्स केंब्रिज स्कूलच्या विद्यार्थिनींनी 'मी सावित्री' ही नाटिका सादर केली. सावित्रीबाई फुलेंचा संघर्ष आणि स्त्री शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या सादरीकरणाला उपस्थितांनी उभे राहून दाद दिली. परिसंवादात 'वाचन संस्कृती'वर उमटला सकारात्मक सूर दुपारच्या सत्रात 'बदलत्या काळात वृद्धिंगत होत चाललेली वाचन संस्कृती' या विषयावर रंगलेल्या परिसंवादाने उपस्थितांची मने जिंकली. या परिसंवादात श्रीनिवास मस्के, कमलेश खिल्लारे, डॉ. राजेंद्र सोनवणे, डॉ. शशिकांत पाटील, राम रौनेकर, पांडूरंग सांगळे आणि डॉ. प्रभाकर शेळके यांनी सहभाग घेतला. डिजिटल युगातही पुस्तकांचे महत्त्व कमी झालेले नाही, उलट वाचनाचे स्वरूप बदलले असून नवी पिढी अधिक सजगपणे वाचन करत आहे, असा सकारात्मक सूर या परिसंवादातून उमटला.

# जालन्यात आज रंगणार भरतनाट्यमचा आविष्कार

## मृगनयनी सिस्टर्स सादर करणार शिवशक्ती-समरस्यम

**जालना । प्रतिनिधी -** येथील कलावर्धिनी ग्रुपच्या वतीने जालनेकर रसिकांसाठी शिवशक्ती-समरस्यम या विशेष भरतनाट्यम नृत्य सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम बुधवार ( दि.११ ) रोजी सायंकाळी ६:३० वाजता जेईएस महाविद्यालयातील चुन्नीलाल जी गोयल सभागृहात पार पडणार आहे. यामध्ये प्रसिद्ध नृत्यांगना भगिनी ईशिता आणि ईशानी कुलकर्णी आपल्या कलेचे सादरीकरण करणार आहेत.

**नृत्यातून उलगडणार शिव-शक्तीचे स्वरूप**

या सादरीकरणाचा मुख्य विषय शिव आणि शक्ती यांचे नृत्यातील विविध पैलू हा आहे. सृष्टीच्या सृजनत्वासाठी आवश्यक असलेले शिव-शक्तीचे एकरूपत्व आणि त्यांचे अर्थपूर्ण स्वरूप या नृत्यातून उलगडले जाईल. भरतनाट्यमच्या माध्यमातून अध्यात्म आणि कला यांचा सुंदर संगम या निमित्ताने अनुभवता येणार आहे.

**आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मृगनयनी सिस्टर्स**

कलाक्षेत्रात मृगनयनी सिस्टर्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ईशिता आणि ईशानी कुलकर्णी या दोन्ही भगिनींना भारत सरकारची प्रतिष्ठित सी.सी.आर.टी. शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

ईशिता कुलकर्णी: यांनी भरतनाट्यममध्ये पदव्युत्तर पदवी संपादन केली असून, इटली आणि पोलंड यांसारख्या देशांतील आंतरराष्ट्रीय महोत्सवांत आपली कला सादर केली आहे.

ईशानी कुलकर्णी: यांनी वयाच्या अवघ्या १० व्या वर्षी अरंगेत्रम पूर्ण केले असून, त्यांनी राष्ट्रीय स्तरावरील अनेक स्पर्धांमध्ये देदीप्यमान यश संपादन केले आहे. या दोन्ही भगिनी आपल्या नृत्याने जालनेकर रसिकांना मंत्रमुग्ध करण्यास सज्ज आहेत. भारतीय शास्त्रीय नृत्याचा हा अनोखा सोहळा अनुभवण्यासाठी जालना शहरातील सर्व कलारसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कलावर्धिनी ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे. हा कार्यक्रम विनामूल्य असून जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

# जालन्यात जागतिक महिला दिनानिमित्त १५४ महिलांची मोफत आरोग्य तपासणी

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून उमेद ग्राम विकास पंचायतराज विभाग आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (जि.प. जालना) यांच्या वतीने आयोजित विक्री प्रदर्शनात एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. मंगळवार, १० मार्च २०२६ रोजी या प्रदर्शनास भेट देणाऱ्या १५४ महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

**तपासणी व औषधोपचार**

शहरातील फ्रेजर बॉईज हायस्कूल मैदानावर सध्या बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंचे भव्य विक्री प्रदर्शन सुरू आहे. या ठिकाणी आरोग्य विभागामार्फत विशेष कक्ष स्थापन करण्यात आला होता. या शिबिरात महिलांची प्रामुख्याने रक्तदाब (बीपी), मधुमेह (शुगर) आणि इतर रक्ताच्या चाचण्या करण्यात आल्या. तपासणीनंतर गरजू महिलांना मोफत औषधींचे वाटपही करण्यात आले.

**तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग**

हे शिबिर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जी. डी. म्हस्के आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एन. जी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले.

महिलांची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी खालील तज्ज्ञ डॉक्टरांनी योगदान दिले: डॉ. प्रज्ञा कुलकर्णी, डॉ. बेबी सरोज घोलप, डॉ. स्मिता पोकळे, डॉ. स्मिता पंडित यावेळी शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र (रामनगर) येथील अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रदर्शनासाठी आलेल्या महिलांनी या उपक्रमाचे स्वागत करत आपल्या आरोग्याबाबत जागरूकता दाखवली.



# वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे ‘पॅट-३’ चाचण्या मार्च अखेरपर्यंत पूर्ण करा

## शेख अब्दुल रहीम यांची शिक्षण आयुक्तांकडे मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राज्यात मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाचा तडाखा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. एप्रिल महिन्यात तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर, शिक्षण विभागामार्फत इयत्ता २ री ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी नियोजित असलेल्या संकलित मूल्यमापन चाचणी-२ ( पॅट ३) एप्रिलऐवजी मार्च अखेरपर्यंत पूर्ण कराव्यात, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ता तथा हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी शिक्षण आयुक्तांकडे केली आहे.

शिक्षण विभागाच्या नियोजित वेळापत्रकानुसार, या चाचण्या ११, १५ आणि २२ एप्रिल २०२६ या कालावधीत होणार आहेत. मात्र, एप्रिलमधील कडक उन्हामुळे विद्यार्थ्यांना, विशेषतः ग्रामीण भागातील मैलोन्मैल पायी प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना उष्माघाताचा () मोठा धोका निर्माण होऊ शकतो. विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि शारीरिक क्षमता विचारात घेऊन हे वेळापत्रक बदलणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

**निवेदनातील प्रमुख मागण्या आणि मुद्दे**

विद्यार्थ्यांचे आरोग्य: एप्रिलमधील दुपारच्या सत्रात परीक्षा असल्यास लहान मुलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

वेळेचे नियोजन: जर या चाचण्या २४ ते ३१ मार्च २०२६ दरम्यान घेतल्या, तर वाढत्या उन्हाचा तडाखा टाळता येईल.

प्रशासकीय सुलभता: मार्चमध्ये परीक्षा झाल्यास एप्रिलच्या सुरुवातीलाच शिक्षकांना निकाल तयार करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल आणि शैक्षणिक वर्षाचे नियोजन सुरळीत होईल.

''विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. वाढत्या उन्हाची दाहकता पाहता, एप्रिलपर्यंत परीक्षा लांबणीवर टाकणे विद्यार्थ्यांसाठी त्रासदायक ठरेल. प्रशासनाने विद्यार्थी हित लक्षात घेऊन मार्च अखेरपर्यंत या चाचण्या पूर्ण करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा,'' अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता तथा हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी केली आहे. या संदर्भातील निवेदन मा. शिक्षण आयुक्त, पुणे आणि मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद () यांना ईमेलद्वारे पाठवण्यात आले आहे. या मागणीमुळे राज्यातील लाखो विद्यार्थी आणि शिक्षकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# लायन्स क्लब व दृष्टी फाउंडेशन यांच्या वतीने डॉ.शंतनू व अविष्कार यांचा सत्कार




**परतूर । प्रतिनिधी -** लायन्स क्लब परतुर व दृष्टी फाउंडेशन मार्फत डॉ शंतनू मोगल व अविष्कार कदम यांचा सत्कार. डॉ शंतनू हरिभाऊ मोगल यांनी एमबीबीएस फॉरेन मध्ये करून भारतातील एफएमजीई परीक्षा पास झाला आहे. अविष्कार तुकाराम कदम ओटीएच वायडन कोर्स बॅचलर ऑफ मेडिकल इंजीनियरिंग कोर्स साठी जर्मनी येथील युनिव्हर्सिटी विना शुल्क प्रवेश मिळाला आहे. दोन्ही मुलांनी अत्यंत मेहनतीने अभ्यास करून एस प्राप्त केले आहे. यासाठी दृष्टी लायन्स नेत्रालय येथे लायन्स क्लब परतुर च्या पदाधिकारी मार्फत पालकांसह सत्कार करण्यात आला. त्यांच्या पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा देऊन इतरांनी यांचा आदर्श समोर ठेवून यश संपादन करावे अशी भावना सर्वांनी व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी लायन्स क्लबच्या अध्यक्ष,छाया सोळंके. रेवती राखे. संजीवनी खालापुरे.मीना मोगल.नीता कदम.मनोहर खालापुरे. तुकाराम कदम. नेत्रालयातील डॉ.निकिता निकम. व इतर डॉक्टर कर्मचारी रुग्णांचे नातेवाईक यांची उपस्थिती होती.

# अनधिकृत होर्डिंग २४ तासांत हटवण्याचे मनपाचे आदेश

## अन्यथा फौजदारी गुन्हा दाखल होणार

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेने शहरातील विद्रुपीकरण थांबवण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कठोर पाऊल उचलले आहे. शहरातील वीजेचे खांब, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना लावण्यात आलेले सर्व होर्डिंग, बॅनर आणि पोस्टर्स तात्काळ हटवण्याचे आदेश महापालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी दिले आहेत.

२४ तासांची अंतिम मुदत

महानगरपालिकेने प्रसिद्ध केलेल्या जाहीर प्रगटनानुसार, सर्व नागरिक, संस्था, जाहिरातदार आणि राजकीय पक्षांना सूचित करण्यात आले आहे की, त्यांनी स्वतःहून २४ तासांच्या आत आपले अनधिकृत साहित्य काढून घ्यावे. मुदत संपल्यानंतरही जे साहित्य हटवले जाणार नाही, ते महापालिकेकडून जप्त केले जाईल आणि संबंधित व्यक्ती किंवा संस्थेवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

कठोर कायदेशीर कारवाईचे संकेत

या मोहिमेअंतर्गत खालील कायद्यांनुसार गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत:

महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ चे कलम ३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५. या शिवाय, अशा अनाधिकृत होर्डिंग्ज/बॅनरमुळे कोणतीही जीवितहानी किंवा अपघात झाल्यास संबंधित व्यक्ती/ संस्था यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल. प्रशासनाने अत्यंत गंभीर इशारा दिला आहे. शहराचे सौंदर्य अबाधित राखण्यासाठी आणि संभाव्य धोके टाळण्यासाठी हा निर्णय प्रशासनाने घेतलेला आहे.

# मोतीबागेत कचरा जाळल्याचा प्रकार; मनपा कर्मचाऱ्यांवर ५ हजारांचा दंड

## सामाजिक कार्यकर्त्याच्या तक्रारीनंतर प्रशासनाची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मोतीबाग परिसरात कचरा जाळल्याचा प्रकार समोर आल्यानंतर अखेर महानगरपालिका प्रशासनाला कारवाई करावी लागली आहे. या प्रकरणी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांनी संबंधित मनपा कर्मचाऱ्यांवर ५ हजार रुपयांचा दंड ठोठावत भविष्यात अशा प्रकारची बेफिकिरी सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा दिला आहे.

काही दिवसांपूर्वी मोतीबाग परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा गोळा करून तो भरवस्त्यात जाळण्यात आला होता. या प्रकारामुळे परिसरात दाट धुराचे लोट पसरले होते. सकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणारे नागरिक तसेच सायंकाळी खेळण्यासाठी येणाऱ्या लहान मुलांना या धुराचा मोठा त्रास सहन करावा लागला. पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या या प्रकारामुळे परिसरात संताप व्यक्त होत होता.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली होती. त्यांच्या तक्रारीची दखल घेत प्रशासनाने तातडीने चौकशी सुरू केली.

चौकशीत कचरा जाळल्याचा



प्रकार समोर आल्यानंतर अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांनी संबंधित मनपा कर्मचाऱ्यांवर ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला. तसेच यापुढे शहरात कुठेही कचरा जाळण्यासारखे प्रकार आढळल्यास अधिक कठोर कारवाई करण्यात येईल, अशा सक्त सूचना देखील कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, शहरात स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा देणाऱ्या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडूनच अशा प्रकारची निष्काळजीपणा घडल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य आणि नाराजी व्यक्त होत आहे. आता तरी प्रशासनाने शहरात कचरा जाळण्याच्या प्रकारांवर कायमस्वरूपी आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## देवळाली रिंग रोडसाठी भूसंपादन;

# शेतकऱ्यांना योग्य मोबदल्याबाबत शासनाचा सहानुभूतीपूर्वक विचार - मंत्री शिवेंद्रसिंहराजे

**मुंबई -** नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तसेच शहरातील वाहतूक कोंडी कमी करून आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील देवळाली मतदारसंघातून प्रस्तावित रिंग रोड अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रस्तावित रिंग रोड प्रकल्पासाठी भूसंपादन सुरू असून जमिनी बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या मोबदल्याबाबत शासन सहानुभूतीपूर्वक विचार करणार आहे, असे सार्वजनिक बांधकाम (सर्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले. नाशिक जिल्ह्यातील देवळाली मतदारसंघातून प्रस्तावित रिंग रोड प्रकल्पासाठी भूसंपादन सुरू असून जमिनी बाधित होणार असल्याने शेतकऱ्यांचा विरोध असल्याचा मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्यात आला. पुणे रिंग रोडप्रमाणे विशेष मोबदला, पुनर्वसन योजना आणि अलाईनमेंट बदलण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत असल्याबाबत सदस्य सरोज अहिरे यांनी लक्षवेधी सूचना मांडली. या चर्चेत सदस्य सीमा हिरे यांनीही सहभाग घेतला. या लक्षवेधीला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले की, प्रस्तावित रिंग रोडचे एकूण अंतर सुमारे ६५.६० किलोमीटर असून त्यापैकी १६ किलोमीटरचा मार्ग नाशिक महानगरपालिकेच्या डीपी रोडवरून नेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या रिंग रोडच्या मार्गाच्या आखणीस व त्यासाठीच्या बांधकामासाठी सुमारे ३,६५९ कोटी रुपये रकमेस मान्यता देण्यात आली आहे. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले, भूसंपादनाच्या प्रक्रियेत जमिनींचे मूल्यांकन रेडी रेकनर दरानुसार तसेच जमिनीची प्रतवारी, जिरायती-बागायती स्वरूप आदी बाबी विचारात घेऊन करण्यात येत असल्याने गावनिहाय दरांमध्ये फरक दिसत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# बुधवारी जालना येथे पहिल्यांदाच विद्यार्थी पक्षीमित्र संमेलनाचे आयोजन

## पक्षी वैभव आणि पर्यावरण रक्षणाचा जागर; वन प्रशिक्षण विद्यालयात आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग आणि पक्षीजगताविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने बुधवार दि.११ मार्च २०२६ रोजी शहरात पहिल्यांदाच विद्यार्थी पक्षीमित्र संमेलन आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन सामाजिक वनीकरण विभाग आणि महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कन्हैया नगर येथील वन प्रशिक्षण विद्यालयात हा उपक्रम पार पडणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त पक्षीप्रेमींनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय वन अधिकारी सुरेश वडोदे यांनी केले आहे.

या संमेलनाचे मुख्य आकर्षण म्हणजे जालना जिल्ह्याचे पक्षी वैभव उलगडणारा स्लाईड शो तसेच महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर गिराम यांच्या दुर्मिळ पक्षी छायाचित्रांचे प्रदर्शन यावेळी भरविण्यात येणार आहे. तसेच अकोला येथील राज्य कार्यकारिणी सदस्य आणि संमेलनाचे आयोजक अमोल सावंत यांचा 'माझे पक्षी अभयारण्य' हा विशेष स्लाईड शो विद्यार्थ्यांना पाहता येईल.

केवळ व्याख्याने न ठेवता, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकता यावे यासाठी विविध कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कृत्रिम घरटी कशी तयार करावीत, याचे प्रात्यक्षिक दिले जाईल. तसेच पक्षी चित्रकला स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा घेण्यात येईल. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून इको क्लबचे किमान १० प्रतिनिधी विद्यार्थी या संमेलनात सहभागी होणार आहेत. हे संमेलन सकाळी १०.३० ते दुपारी ३ या वेळेत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला विभागीय वन अधिकारी सुरेश वडोदे, अमोल सावंत, ज्ञानेश्वर गिराम, मधुकर गायकवाड, मयूर साबळे, सुभाष पारे यासह सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.